# अटके बाबतच्या कायदेशीर तरतुदी व अटक करण्याची पध्दत

गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण विद्यालय नाशिक

# अटके म्हणजे काय व अटकेचा उद्देश

- अटक हा पोलीस तपासातील सर्वात महत्वाचा भाग असुन चुकीची पध्दत अवलंबल्यामुळे पोलीसांना कायदेशीर कारवाईला सामोरे जावे लागते. त्यामुळे पोलीस दलाबद्दल जनमानसात वाईट प्रतिमा तयार होते. त्या करीता अटकेबाबतच्या कायदेशीर तरतुदी व पध्दत जाणुन घेणे हि प्रत्येक पोलीस अधिकारी / अंमलदार जबाबदारी आहे.
- एखाद्या नागरिकाने काही गुन्हा केला आहे म्हणुन त्याच्याविरूध्द तथाकथित तक्रार केली जाते. त्याचा परीणाम म्हणुन त्याच्यावर शारीरिक बंधन आणले जाते म्हणजे अटक होय,
- अटक झाली आहे असे म्हणण्याकरता त्या व्यक्तीस पकडले जाते अगर व्यवहारीक भाषेत अटक म्हणजे व्यक्तीस्वातंत्राचे हरण करणे होय,
- अटक करण्यामागे दोन उद्देश असतात १) कोर्टापुढे अशा इसमास हजर करणे, २) त्याला त्याचे बेकायदेशीर कृत्य करण्यापासुन परावृत्त करणे

# अटक कोण करू शकतो व त्याबाबतच्या कायदेशी तरतुदी

१) पोलीस अधिकारी / अंमलदार

२) खासगी  नागरीक

३) न्यायाधिशांना

- पेलीसांचे अकचे अधिकारी :- फौजदारी दंडा प्रक्रिया संहिता कलम ४१, ४२, १५१ व ४३२(३) तसेच म.पो.अधि. कलम ६९, ७९, ८१ व १२० प्रमाणे पोलसांना विनावॉरंट अटक करण्याचे अधिकार आहेत.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

- या कलमातील पोट कलम १ प्रमाणे विविध ९ कारणांकरीता कोणत्याही पोलीस अधिका-यास म्हणजे पोलीस शिपाई ते पोलीस महासंचालक दर्जाचे अधिका-यापर्यंत कोणासही अटक करता येते. तर पोट कलम २ प्रमाणे पोलीस ठाणे अंमलदारास (पोलीसा शिपाई वगळुन) अटक करण्याचे अधिकार आहेत.
- कलम ४१(१) प्रमाणे खालील परिस्थीतीत अटक करता येते :-

१)एखादी व्यक्ती दखलपात्र अपराधाशी संबधीत आहे. अगर तशी फिर्याद करण्यात आली आहे. अगर विश्वसनीय खबर मिळालेली आहे. अगर तसा वाजवी संशय आहे.

२) एखाद्या व्यक्तीकडे घरफोडीचे हत्यार मिळुन आले आहे. आणि तसे हत्यार ठेवण्यास कायदेशीर सबब नाही. जर काही सबब असेल तर त्यास सिध्द करावे लागेल.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

३) त्या व्यक्तीला फौ.द.प्र.सं. अगर राज्य शासनाच्या आदेशाव्दारे अपराधी म्हणुन जाहीर केलेले आहे.

४) चोरीचा माल त्या व्यक्तीपाशी मिळाला आहे. आणि तसा वाजवी संशय घेता येईल.

५) पोलीसांच्या कर्तव्यात अडथळा आणणारी व्यक्ती अगर हि व्यक्ती कायदेशीर रखवालीतुन निसटली आहे. अगर तसा प्रयत्न केला आहे.

६) केंद्र सरकारच्या सशस्त्र सेनादलापैकी कोणत्याही सेनादलातुन पळुन आल्याचा वाजवी संशय अगर खात्री असल्यास

७) भारतात जे कृत्य केले असता गुन्हा झाला असता असा गुन्हा जर भारताबाहेर केला आहे. अगर तशी फिर्याद दिली आहे. अगर विश्वसनीय खबर दिली आहे किंवा तसा वाजवी संशय आहे तेव्हा

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

८) जी व्यक्ती दोषी ठरून क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम ३५६(५) प्रमाणे तरतुद केली आहे, पण त्या व्यक्तीने त्यातील नियमांचा भंग केला आहे तर त्या व्यक्तीस

९) दुस-या पोलीस स्टेशनमधुन अटकेकरता लेखी अगर तोंडी मागणी असेल आणि त्या मागणीपत्रात अपराध आणि अन्य कारण दर्शविलेले असेल तर त्या पोलीस स्टेशन मधील अधिका-यास वरील सर्व कारणांकरीता वॉरंटाशिवाय अटक करता येते.

- कलम ४१(२) प्रमाणे चॅप्टर केसेस कलम १०९-११० मधील कोणत्याही व्यक्तीस पोलीस ठाणे अंमलदार अटक करू शकेल किंवा अटक करवु शकेल.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४१ प्रमाणे अटकेचे अधिकार

८) जी व्यक्ती दोषी ठरून क्रिमीनल प्रोसिजर कोड कलम ३५६(५) प्रमाणे तरतुद केली आहे, पण त्या व्यक्तीने त्यातील नियमांचा भंग केला आहे तर त्या व्यक्तीस

९) दुस-या पोलीस स्टेशनमधुन अटकेकरता लेखी अगर तोंडी मागणी असेल आणि त्या मागणीपत्रात अपराध आणि अन्य कारण दर्शविलेले असेल तर त्या पोलीस स्टेशन मधील अधिका-यास वरील सर्व कारणांकरीता वॉरंटाशिवाय अटक करता येते.

- कलम ४१(२) प्रमाणे चॅप्टर केसेस कलम १०९-११० मधील कोणत्याही व्यक्तीस पोलीस ठाणे अंमलदार अटक करू शकेल किंवा अटक करवु शकेल.

## फौ.दं.प्र.सं. कलम ४२ प्रमाणे अटकेचे अधिकार

**पोटकलम १)** पोलीस अधि-यासमक्ष एखाद्या नागरिकाने बिनदखली अपराध केला आहे अगर तसा आरोप असेल तर त्या पोलीस अधिका-याने नाव-गांव विचारल्यावर जर नगार दिला अगर खोटे सांगितले, तर त्याची खात्री करता यावी म्हणुन अटक करू शकेल.

**पोटकलम २)** जर खरे नांव सांगीतले तर त्याचा जामीन जामीनदारासह अगर न घेता त्याने न्यायधिशांपुढे हजर व्हावे म्हणुन लिहुन घेतला जाईल.

**पोटकलम ३)** अटक केल्यापासुन २४ तासांच्या आत जर खरे नाव-गांव कळले नाही, अगर त्या व्यक्तीने जामीन देण्याचे टाळले, तर त्या व्यक्तीस त्वरीर नजीकच्या अधिकार असलेल्या न्यायाधिशांपुढे हजर करावे.

# नागरीकांना अटकेचे अधिकार

- नागरिका समक्ष एखादा **दखलपात्र परंतु बिगर जामीनाचा** गुन्हा घडत आहे तर त्या परिस्थीतीत गुन्हेगारास अटक करता येते.
- कोर्टामार्फत ज्याच्या विरूध्द अटकेचा जाहीरनामा काढला आहे. उदा असा आरोपी ज्यास समन्स वॉरंट काढुनही तो न्यायालयात हजर होत नाही, वेळोवेळी फरारी होवुन टाळाटाळ करतो अशा प्रकारात आरोपीस अटक करता येते.
- घडलेला गुन्हा हा दखलपात्र व बिगर जामीनाचा असणे गरजेचे आहे. उदा खुन, जबरी चोरी जाळपोळ असे गंभीर गुन्हे या सदराखाली भारतीय दंड विधान संहिते अंतर्गत येणे आवश्यक आहे. (उदा कलम ३०२, ३९२, ४३५ वगैरे )
- नगरीकांना अशा आरोपीस पकडुन नजीकच्या पोलीस अधिका-याकडे अथवा पोलीस ठाण्यात हजर करावे.

# नागरीकांना अटकेचे अधिकार

- पोलीस अधिकारी / अंमलदार यांनी नागरीकांनी पकडुन आणलेल्या आरोपीची व त्याने केलेल्या अपराधाची चौकशी करावी, जर गुन्हा अदखलात्र स्वरूपाचा असल्यास फौ.दं.प्र.सं. कलम ४२ प्रमाणे कार्यवाही करावी. परंतु जर कोणताही अपराध केल्याचे पुरेसे कारण नसेल तर तशी स्टेशनडायरीला नोंद करून त्यास सोडुन द्यावे.
- ब-याच प्रकरणात नागरीक हे आरोपीला प्रथम मारहाण करतात त्यानंतर त्यास पोलीसांचे स्वाधीन करतात. अशा वेळी आरोपीला हजर करणारे नागरीकांची नावे, पत्ते यांची नोंद करावी. तसेच आरोपीला नागरीकांनी हजर केल्या बाबतची नोंद स्टेशनडायरी मध्ये करावी. व सर्वप्रथम आरोपीला तपासणी करीता वैद्यकीय अधिकारी यांचे कडेस घेवुन जावे. यात कोणताही हलगर्जीपणा करू नये. आरोपी पोलीसांचे स्वाधीन झाले नंतर त्याचे जिवीताची सर्व जबाबदारी ही पोलीसांची असते.

# न्यायाधिशांचे  अटकेचे अधिकार

- फौ.दं.प्र.सं. कलम ४४ प्रमाणे प्रथमवर्ग अथवा कार्यकारी न्यायाधिशांना त्याचे **अधिकार क्षेत्रात** त्यांच्या समक्ष कोणताही गुन्हा घडला असेल तर स्वत: अटक करू शकतील किंवा इतर कोणास अटक करण्याचा आदेश देईल. तसेच जामीनाच्या नियमाप्रमाणे त्याला कसटडीत पाठवु शकेल. तसेच त्यांच्या अधिकारक्षेत्रात अशा न्यायाधिशांना ज्यांच्याबाबत ते वॉरंट काढु शकतात असे गुन्हे त्यांच्या समक्ष घडले तर स्वत: किंवा दुस-याला आदेश देवुन अटक करतील

# फौ.दं.प्र.सं. कलम १५१ प्रमाणे अटकेचे अधिकार

- या कलमान्वये एखादी व्यक्ती अगर जास्त इसम दखलपात्र गुन्हा करण्याचया तयारीत आहेत आणि त्यांना प्रतिबंध करण्याकरीता अटक करणे आवश्यक आहे, तर न्यायालयाचे आदेशाशिवाय आणि वॉरंटाशिवाय अटक करता येते. परंतु या कार्यवााहीत अटक केलल्या व्यक्तीला २४ तासांपेक्षा जास्त काळ स्थानबध्द करता येणार नाही.

  परंतु महाराष्ट्र शासनाने २७ ऑगष्ट १९८० पासुन या कलमात सुधारणा करून त्यात पोट कलम ३ हे नव्याने समाविष्ठ केले आहे. या पोटकलामन्वये १) अटक केलेली व्यक्ती सुटका झालेनंतर एखादा दखलपात्र अपराध करण्याची शक्यत असल्यास तसेच २) अशी व्यक्ती मोकळी राहणे हे सार्वजनिक सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीने बाधक आहे. या दोन कारणासांठी एकाच वेळी १५ दिवस व जास्तीत जास्त ३० दिवस स्थानबध्द करता येण्याची तरतुद केली आहे.

# फौ.दं.प्र.सं. कलम १५१ प्रमाणे अटकेचे अधिकार

- परंतु या कलमान्वये करण्यात येणा-या प्रतिबंधक कारावाईच्या अधिकाराचा पोलीस दला कडुन मोठया प्रमाणात गैरवापर होत असल्याने त्या बाबत न्यायालयाने पोलीस दलावर ताशेरे ओढले आहेत. या अधिकाराचा गैरवापर केल्यास पोलीसांविरूध्द कायदेशिर कारवाई होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कलमान्वये मिळालेल्या अधिकाराचा वापर हा योग्य प्रकारेच केला पाहीजे.

# फौ.दं.प्र.सं. कलम ४३२ (३) प्रमाणे अटकेचे अधिकार

- **पॅरोलवर सुटलेला आरोपी :-** एखादा आरोपी शिक्षा भोगत आहे परंतु सरकारने त्याची शिक्षा तात्पुरती स्थगित करून त्याला मोकळे केले आहे आणि त्यावेळी त्याच्यावर काही अटी लादलेल्या आहेत. म्हणजेच त्याचाी सशर्त मुक्तता झाली आहे. पण नंतर लादलेल्या अटींचा भंग केला आहे असे सरकारला वाटते म्हणुन त्याची ताप्तुरती माफी रद्द केली जाते. अशा वेळी **कोणत्याही पोलीस अधिका-यास / अंमलदारास** त्याला विनावॉरंट अटक करण्याची तरदुत सदर कलमान्वये आहे.

# महाराष्ट्र पोलीस अधिनियामान्वये अटकेचे अधिकार

- **कलम ६८** :- या कलमान्वये विशिष्ट कारणासाठी शांतता राखण्याबाबत पोलीसांनी दिलेल्या सुचनाचे पालन नागरीकांने केले नाही तर अशा वेळी त्यांना पोलीस विनावॉरंट अटक करू शकतात. आवश्यकता असल्यास न्यायालयासमोर हजर करू शकतात गुन्हा / प्रकार किरकोळ स्वरूपाचा असल्यास कलम ६९ अन्वये त्यांना सोडुन देउ शकतात.
- **कलम ७९** :- कोणत्याही पोलीस अधिका-यास / अंमलदारास त्याचे समक्ष , म.पो.अधि. कलम १७७, १२५, १३० किंवा कलम १३१ चे पोटकलम (१), (४), किंवा (५) अन्वये शिक्षापात्र अपराध करेल तेव्हा अशा कोणत्याही व्यक्तीस विनावॉरंट अटक करण्याचा अधिकार आहे.

# महाराष्ट्र पोलीस अधिनियामान्वये अटकेचे अधिकार

- **कलम ८१ :-** या कलमान्वये म.पो.अधि. अन्वये पोलीस अधिकारी / अंमलदार यांचे समक्ष अदखलपात्र गुन्हा घडले नंतर संबधीत व्यक्तीला तसे न करण्याची ताकीद देता येते, पण ताकीद देवुनही सदर व्यक्ती गुन्हा करीता राहीला अगर त्यास पोलीस स्टेशन मध्ये येण्यास सांगीतले असुन त्याने नकार दिल्यास त्याला विनावॉरंट अटक करण्याचा अधिकार आहे.
- **कलम १२० :-** कलम ११० अन्वये सार्वजनिक जागेत शिवीगाळ करणे, खासगी जागेत अतिक्रमण केल्यास अशा व्यक्तीला कलम १२० प्रमाणे विनावॉरंट अटक करण्याचा अधिकार आहे.

# अटक करण्याची पध्दत

- फौ.दं.प्र.सं. कलम ४६ अन्वये नागरीकांना अटक कशी करावी याची विशिष्ट पध्दत या कलमातील पोट कलम १ ते ३ नमुद केली आहे

**पोट कलम १) :-** जर अटक होणा-या व्यक्तीने शब्दाने अगर कृतीने स्वाधीन होण्याची तयारी दर्शविली तर अटकेला पुरेशी आहे. पण तशी तयारी दर्शविली नाही तरच त्या व्यक्तीच्या शरीरास प्रत्यक्षपणे स्पर्श करावा. अगर त्याला वेढा घालावा. शब्द - कृती पुरेशी असते असे सुप्रीम कोर्टाने A.I.R – 1980 S.C. 1632/1980 Cr. L.J. 125 मध्ये म्हटले आहे.

**पोट कलम २) :-** पण जर अशा व्यक्तीने पोलीसांना प्रतिकार केला किंवा अटक चुकविण्याचा प्रयत्न केला तर पोलीस अधिकारी अगर अन्य व्यक्ती अटक करण्यासाठी जरूर त्या सर्व मार्गाचा अवलंब करता येईल.

# अटक करण्याची पध्दत

**पोट कलम ३)** :- मात्र अटक करतांना त्या व्यक्तीचा मृत्यु घडवुन आणण्याचा हक्क मिळत नाही. पण याला एक **अपवाद** आहे. जर ज्या गुन्हयाबाबत अटक करणे आहे तो गुन्हा जर गंभीर भारी स्वरूपाचा असेल म्हणजेच त्याला मृत्यूची (फाशी) अगर अजीवन कारावासाची शिक्षा आहे. जसे खुन - दरोडा - बलात्कार वगैरे गुन्हे यात मोडतात.

वरील कायदेशिर कलम पहाता हे स्पष्ट होते की, कायद्यात अटकेची व्याख्या दिली नसली तरी पध्दत दिली आहे. ती पध्दत वापरूनच नागरिकास अटक करावी. प्रत्यक्षात स्पर्श अगर बेडया काढण्या घालणे बिलकुल समर्थनीय नाही. केवळ तुम्हास अटक केली आहे - YOU ARE UNDER ARREST म्हणुन तो स्वाधीन झाला की पुरेसे आहे.

# प्रश्न व सुचना



# धन्यवाद ....